मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 10 जून 2025 | पान- 1

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ऑक्टोबरमध्येच

## तीन टप्प्यांत निवडणूक घेण्याचे नियोजन : राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका घ्या, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर राज्यामध्ये निवडणूक आयोगाची तयारी सुरू झाली आहे. प्रशासकीय नियोजनानुसार तीन टप्प्यांत निवडणूक घेण्याचे नियोजन करत असल्याचे राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील 20 मनपा 257 नगरपालिका, 20 जिल्हा परिषद आणि 288 पंचायत समित्यांसाठी ऑक्टोबर महिन्यात या निवडणुका होतील एकूणच निवडणूक प्रक्रिया अंतिम करण्यासाठी तीन ते साडेतीन महिन्यांचा कालावधी लागेल म्हणून ऑक्टोबरमध्ये निवडणुका घेता येतील, असे राज्य निवडणूक आयुक्त वाघमारे यांनी सांगितले आहे.




काही दिवसांपूर्वी राज्य निवडणूक आयोगाने सर्व महापालिका, जिल्हा परिषदांना एक पत्र पाठवले होते. त्यात जूनअखेरपर्यंत वॉर्ड, प्रभाग तसेच गण गट रचना करून घेण्याचे आदेश दिले गेले आहेत. निवडणूक आयोगानुसार पहिल्या टप्प्यात उत्तर व दक्षिण महाराष्ट्रात मतदान होईल. दुसऱ्या टप्प्यात विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा तर तिसऱ्या टप्प्यात, मुंबई, ठाणे आणि कोकणात मतदान व्हावे, अशी आखणी केली आहे.

### पावसाचाही अंदाज घेतला जाणार

» एकाच टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी ईव्हीएमची गरज भासणार आहे. मात्र राज्य निवडणूक आयोगाकडे फक्त ६५ हजार ईव्हीएम असल्यामुळे तीन टप्प्यात निवडणूक घेण्याची तयारी आयोग करत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यापूर्वी पावसाचाही अंदाज घेतला जाणार आहे. त्यानुसार त्यासाठी हवामान खात्याच्या तज्ञ अधिकाऱ्याशी चर्चा करण्यात येईल, असे वाघमारे म्हणाले.

# महापालिकेच्या मोशी रुग्णालयात रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयातील रक्त पेढी मध्ये गरजू रुग्णांसाठी रक्त संकलित

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मोशी रुग्णालय व जीवनशेठ तापकीर मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन आमदार महेश लांडगे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांच्या हस्ते करण्यात आले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयातील रक्त पेढी मध्ये गरजू रुग्णांसाठी रक्त संकलित केले जाते. यासाठी महापालिका व जीवनशेठ तापकीर मित्र परिवाराच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरात एकूण २३ रक्तदात्यांनी सहभाग घेतला असून ६९ युनिट रक्त संकलित करण्यात आले. हे रक्त समाजातील गोरगरीब व गरजू रुग्णांसाठी उपयुक्त ठरणार आहे.



या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनात भोसरी रुग्णालय प्रमुख डॉ. शिवाजी ढगे, मोशी दवाखान्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. रामनाथ बच्छाव, वायसीएम रुग्णालय रक्त पेढीचे डॉ. गणेश लांडे आणि समाजसेवा अधिक्षक किशन गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते उदय तापकीर आदींचे सहकार्य लाभले.

> रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून या सामाजिक उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व दात्यांचे व सहकार्य करणाऱ्या संस्थांचे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मनःपूर्वक आभार.
> **- डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# नाट्यगृहांत रंगला मूषक बंदोबस्ताचा प्रयोग

## पुणे महापालिका प्रशासनाकडून समूळ स्वच्छता (डीप क्लिनिंग) मोहीम

**पुणे | प्रतिनिधी**

कोथरूडमधील पुणे महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात प्रशासनालाच मूषक बंदोबस्ताचा प्रयोग करावा लागला. नाटक सुरू असताना नाट्यरसिकाच्या कपड्यात उंदीर घुसल्याच्या धक्कादायक प्रकारामुळे खडबडून जागे झालेल्या प्रशासनाने या, तसेच बालगंधर्व रंगमंदिरातही समूळ स्वच्छता (डीप क्लिनिंग) मोहीम राबविली.

अनेकदा वेळकाढूपणा करून समस्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनाला उंदीर, झुरळे, ढेकूण, घुशी यांचा बंदोबस्त करण्यासाठी पावले उचलावी लागली. त्याचा एक भाग म्हणून 'पेस्ट कंट्रोल'चे कामही हाती घेण्यात आले.




महापालिकेच्या शहरातील नाट्यगृहांच्या स्वच्छतेचा व असुविधांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्याचा त्रास कलाकार आणि रसिकांना वारंवार होतो. यापूर्वी नाट्यगृहातील वातानुकूलन यंत्रणा बंद पडणे, ध्वनिव्यवस्थेचे संच चोरीला जाणे, तुटलेल्या खुर्च्यांची दुरुस्ती न होणे, पाणी गळणे अशा अनेक समस्यांचा नाट्यप्रेमींना सामना करावा लागत आहे.

समन्वयाचा अभाव महापालिकेच्या सांस्कृतिक, भवन रचना आणि विद्युत या विभागांत समन्वय नसल्याने हे प्रकार वारंवार घडत असतात. कमालीच्या अस्वच्छतेमुळे उंदीर, घुशींचा उपद्रव वाढला असून, नाट्यप्रेमींना झुरळे, ढेकणांचा त्रास होऊ लागला आहे. याबाबत नागरिकांनी अनेक तक्रारी करूनही नाट्यगृह व्यवस्थापनाने हे प्रकार किरकोळ असल्याचे सांगत दुर्लक्ष करण्याचीच भूमिका घेतली आहे.

काही दिवसांपूर्वी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात नाटक सुरू होण्यापूर्वी प्रेक्षागृहात उंदीर फिरताना अनेक प्रेक्षकांना दिसले, पण नाटक सुरू झाल्यानंतर ते गायब होतील असे वाटले होते. प्रत्यक्षात नाटक सुरू असताना एका प्रेक्षकाच्या कपड्यात उंदीर शिरल्याने नाट्यरसिकांना धडकी भरली.

त्यानंतर महापालिका प्रशासनावर टीकेची झोड उठली होती. परिणामी, वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही त्याची दखल घ्यावी लागली. असा प्रकार पुन्हा होऊ नये म्हणून चव्हाण नाट्यगृह व बालगंधर्व रंगमंदिरातील प्रेक्षागृह, व्यासपीठ, कलाकारांच्या खोल्या, स्वच्छतागृह, नाट्यगृहाच्या इमारतीचा परिसर या ठिकाणी स्वच्छता करण्यात आली.

> “पुणे महापालिकेची सर्वच नाट्यगृहे आणि सांस्कृतिक केंद्रांमध्ये समूळ स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह आणि बालगंधर्व रंगमंदिरातील हे काम पूर्ण झाले आहे. नाट्यगृहांत उंदरांचा त्रास होऊ नये म्हणून प्रेक्षागृहात खाद्यपदार्थ आणण्यावर नियंत्रण घालण्याबाबतही विचार केला जाणार आहे.
>
> **- सुनील बल्लाळ, उपायुक्त, सांस्कृतिक विभाग, महापालिका.**

# हिंजवडी आयटी पार्कमध्ये जलवाहतूक सुरु करा!

## आमदार रोहित पवार यांची महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे अनोखी मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधील रस्त्यांना पावसामुळे नद्यांचे रूप आल्याचे चित्र आहे. यामुळे हिंजवडी आयटी पार्क नव्हे, तर वॉटर पार्क अशी स्थिती निर्माण झाली आहे. यावरून राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (एमआयडीसी) अनोखी मागणी केली आहे. आयटी पार्कमध्ये जलवाहतूक सेवा सुरू करावी, असे त्यांनी म्हटले आहे .आयटी पार्कमध्ये शनिवारी (ता. ७) सकाळी पाऊस झाला होता. त्यानंतर तेथील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचले.




या पाण्यातून वाट काढणाऱ्या वाहनांच्या चित्रफिती समाज माध्यमांवर टाकण्यात आल्या आहेत. यावर आमदार रोहित पवार म्हणाले की हे एखादं वॉटर पार्क नाही तर पुण्यातील हिंजवडी आयटी पार्क आहे. अर्ध्या तासाच्या पावसात हिंजवडी आयटी पार्क जलमय झालं. यंदाचा हवामान खात्याचा समाधानकारक पावसाचा अंदाज बघता हिंजवडीत बोटिंग सर्विसची पर्यायी व्यवस्था उभारण्यास एमआयडीसीला अडचण नसावी. चार-चार तास वीज नसते, संध्याकाळची वाहतूक कोंडी तीन-चार तास खाते, राज्यातल्या सर्वांत मोठ्या आयटी पार्कचा हा विकसित चेहरा बघून गुंतवणूकदार येतील का? आहेत त्या कंपन्या इथे थांबतील का? असे प्रश्न पडतात. लाखो लोकांना रोजगार, शिक्षण देणाऱ्या आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुणे शहराकडे राज्यकर्त्यांनी लक्ष द्यावं, ही विनंती!

### आयटीयन्सचे ताशेरे

» ‘फोरम फॉर आयटी एम्प्लॉईज’ने (एफआयटीई) या मुद्द्यावरून सरकारी यंत्रणांना जाब विचारला आहे. ‘एफआयटीई’चे म्हटले आहे की, ‘पावसाचे पाणी तुंबल्यामुळे ‘आयटी पार्क’चे ‘वॉटर पार्क’ झाले. पाणी तुंबलेल्या ठिकाणी आम्ही जाऊन पाहणी केली. त्यावेळी सांडपाणी वाहिन्या पूर्णपणे चिखल, गवत, झाडे, बांधकामाचे साहित्य, मेट्रोच्या बांधकामाचे साहित्य यामुळे तुंबलेल्या आढळून आल्या. आयटी पार्कमधील पावसाचे पाणी वाहून नेणारी यंत्रणा पूर्णपणे बदलण्याची आवश्यकता आहे. आयटी पार्कमध्ये बांधकामे वाढली असून, नाल्यांवर अतिक्रमण झाले आहे. पावसाचे पाणी तुंबू नये, यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करायला हव्यात.’

### सुळे यांची उपाययोजनांची मागणी

याबाबत खासदार सुप्रिया सुळे यांनी दीर्घकालीन उपाययोजनांची मागणी केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, हिंजवडीमधील टप्पा २ परिसरातील रायन इंटरनॅशनल स्कूलजवळ आणि इतर भागांत जोरदार पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. या भागात पाण्याचा निचरा होण्यासाठी व्यवस्था आहे, की नाही, अशी शंका येते. येथील नालेसफाईसारखी कामे वेळेत होण्याची गरज असतानाही ती झालेली नाहीत. एमआयडीसीने यात तातडीने लक्ष घालून भविष्यात पाणी साचून नागरिकांना त्रास होऊ नये, यासाठी दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात.

# निवडणूक आयोगाच्या आदेशाकडे इच्छुकांचे डोळे

## न्यायालय आदेशाला लोटला महिना, पिंपरी-चिंचवड महापालिकेची फेब्रुवारी 2022 मध्ये मुदत संपली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला दिले होते. त्या आदेशाला महिना होत आला तरी, अद्याप त्याबाबतची अधिसूचना निवडणूक आयोगाने काढलेली नाही. त्यामुळे निवडणूक कधी होणार, याबाबत माजी नगरसेवकांसह इच्छुकांमध्ये संभ्रमाची अवस्था आहे. आयोगाच्या आदेशाकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिकेची फेब्रुवारी 2022 मध्ये मुदत संपली. त्यापूर्वी 2017 मध्ये निवडणूक होऊन महापालिकेत भाजपची सत्ता आली. भाजपची पाच वर्ष सत्ता असताना 2021 पासून शहरातील तत्कालीन नगरसेवक व इच्छुकांनी आपआपल्या प्रभागात जोरदार तयारी सुरू केली होती. त्यानंतर फेब्रुवारी 2022 मध्ये निवडणुका झाल्या नाहीत. महापालिका 12 मार्च 2022 ला बरखास्त झाली. महापालिकेत 13 मार्च 2022 पासून प्रशासकीय राजवट लागली. सव्वातीन वर्षे होत आले तरी, अद्याप महापालिकेत आयुक्तांच्या माध्यमातून प्रशासकीय कारभार सुरू आहे.

ओबीसी आरक्षणाबाबत 2022 च्या आधीची परिस्थिती होती, ती परिस्थिती कायम ठेवत चार महिन्यांत महापालिकेच्या निवडणुका घ्या, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने महिन्याभरापूर्वी दिले. निवडणुकीबाबत चार आठवड्यातच नोटिफिकेशन काढा, असेही आदेशात म्हटले होते; मात्र एक महिन्यानंतरही अद्याप निवडणूक आयोगाने अधिसूचना न काढल्याने शहरातील इच्छुकांचे टेन्शन वाढले आहे. इच्छुकांनी तयारी सुरू केलेली असताना दुसरीकडे निवडणुकीबाबत स्पष्टता येत नसल्याने संभ्रम वाढला आहे.

प्रभागरचना नेमकी कोणती राहणार, याबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लावले जात आहे. विशेषतः सन 2017 च्या चार सदस्यीय प्रभाग रचनेप्रमाणे की 2022 मधील केलेल्या तीन सदस्यीय प्रभाग रचनेनुसार निवडणुका होणार, याकडे इच्छुक, माजी नगरसेवक व राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे.



### चार की तीन सदस्यीय प्रभाग?

» राज्य सरकारने पिंपरी-चिंचवड महापालिकेबाबत सन 2017 मधील जुनी प्रभागरचना कायम ठेवण्याचे संकेत दिले आहेत. शेजारच्या पुणे पालिकेसाठी नव्याने प्रभागरचना तयार करावी लागणार आहे. महापालिकेत नवीन गावे समाविष्ट झाल्याने तेथे नव्याने प्रभागरचना केली जाणार आहे. त्याबाबत अधिसूचना येत नाही तोपर्यंत स्पष्टता येणार नसल्याचे बोलले जात आहे.

### प्रभागातील लढतीबाबत पडद्याआडून हालचाली

» राजकीय इच्छुक, पक्षांचे स्थानिक नेते यांच्याकडून सावध हालचाली केल्या जात आहे. प्रभाग रचनेबाबतची स्पष्टता येत्या काही दिवसात स्पष्ट होईल, असा दावा केला जात आहे. तोपर्यंत शहरातील प्रमुख आणि महायुती आणि महाविकास आघाडीतील नेत्यांनी पडद्यामागे हालचाली सुरू ठेवल्या आहेत. पुढील काही दिवसांत निवडणूक आयोगाकडून अधिसूचना जाहीर झाल्यानंतरच कोणता प्रभागात कोणता पक्ष कोणाच्या विरोधात लढेल, हे स्पष्ट होईल.

### निवडणूक घोषणेची प्रतीक्षा

» प्रभाग रचनेबाबत अनिश्चितता कायम असली तरी इच्छुकांनी मतदारांशी संपर्कात राहण्यासाठी कार्यक्रम सुरू ठेवले आहेत. काहीजण खर्चावर मर्यादा ठेवत मैदानात सक्रिय आहेत, तर काही माजी नगरसेवक अजूनही शांतपणे परिस्थितीचा अंदाज घेत आहेत. इच्छुकांमध्ये वर्गणी, कार्यकर्ता सन्मान, प्रचार साहित्य यावर होणाऱ्या खर्चाबाबत चिंता आहे. त्यामुळे निवडणुकीचा अधिकृत बिगुल वाजेपर्यंत बहुतांश इच्छुक थांबण्याच्या धोरणावर कायम आहेत.

# ...अखेर पाटीलनगर येथील रोहित्राचे स्थलांतर; वाहतूक कोंडीतून नागरिकांना मिळणार दिलासा

## पाटीलनगर परिसरात रहिवासी भाग वाढल्याने नागरिकांची व वाहनांची वर्दळ वाढल्याने रोहित्र वाहतुकीस अडथळा ठरत होते.

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली येथील पाटीलनगरकडे जाणाऱ्या उतारावरील रस्त्यात महावितरणकडून रोहित्र बसविण्यात आले होते. परंतु, पाटीलनगर परिसरात रहिवासी भाग वाढल्याने नागरिकांची व वाहनांची वर्दळ वाढल्याने रोहित्र वाहतुकीस अडथळा ठरत होते. यामुळे पाटीलनगर व देहू-आळंदी मार्गावर वाहतूक कोंडी नित्याची झाली होती.

येथील रोहित्र हटविण्यासाठी अनेक वर्षांपासून चिखलीकर महावितरण व महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करत होते. अखेर पाटीलनगर येथील रोहित्र हटविल्याने येथील नागरिकांची वाहतूक कोंडीतून मुक्तता होणार आहे

चिखली- पाटीलनगर येथे देहू-आळंदी रस्त्यावर वाहतुकीला अडथळा ठरणारा महावितरणचे रोहित्र हटविण्याबाबत सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र यादव, सामाजिक कार्यकर्ते विकास साने यांनी आंदोलन, पाठपुरावा केला होता. माजी नगरसेवक कुंदन गायकवाड, युवा नेते विनायक मोरे यांनीही आमदार महेश लांडगे यांच्याकडे तसेच महापालिका प्रशासन, महावितरण यांच्याकडे पाठपुरावा केला होता. पाटीलनगर परिसरात रहिवासी भाग वाढल्याने नागरिकांची व वाहनांची वर्दळ वाढल्याने रोहित्र वाहतुकीस अडथळा ठरत होते. यामुळे पाटीलनगर व देहू-आळंदी मार्गावर वाहतूक कोंडी नित्याची झाली होती. येथील रोहित्र हटविण्यासाठी अनेक वर्षांपासून चिखलीकर महावितरण व महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करत होते. अखेर रस्त्यात अडथळा ठरणारे रोहित्र हटविल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



“ पाटीलनगरच्या रोहित्रामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता. यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत होती. हा रस्ता विना अडथळा वाहतुकीसाठी उपलब्ध व्हावा, यासाठी आमदार महेश लांडगे यांच्याकडे तसेच महावितरण विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. अखेर रोहित्राचे स्थलांतर करण्यात आले.

- विनायक मोरे, सामाजिक कार्यकर्ते.

“ रोहित्राचे स्थलांतर करण्यासाठी योग्य जागा शोधने आवश्यक होते. त्यानुसार परिसरात जागा निश्चित केली. आमदार महेश लांडगे यांनी महावितरण, महापालिका अधिकाऱ्यांना सोबत घेऊन चर्चा केली. नागरिकांना होणारा त्रास, वाढणारी कोंडी दूर करण्यासाठी अखेर रोहित्राचे स्थलांतर केले.

- कुंदन गायकवाड, माजी नगरसेवक

# “आगामी निवडणुकांसाठी तयारीला लागा” : कुलदीप कोंडे

**भोर तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांची एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक नसरापूरजवळील शिवरे गावात उत्साही वातावरणात पार पडली.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोर तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांची एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक नसरापूरजवळील शिवरे गावात उत्साही वातावरणात पार पडली. या बैठकीचे आयोजन शिवसेना तालुका संघटक कुलदीप कोंडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. तालुक्यातील सर्व प्रमुख विभागप्रमुख, शाखाप्रमुख, महिला आघाडी, युवा सेना पदाधिकारी आणि शिवसेनेचे निष्ठावान कार्यकर्ते मोठ्या संख्येने या बैठकीस उपस्थित होते.

बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक तयारी, जनतेपर्यंत शिवसेनेची विचारधारा पोहोचवणे, व गावपातळीवर पक्षाचे जाळे अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला. या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना कुलदीप कोंडे म्हणाले, “आगामी निवडणुका म्हणजे केवळ सत्तेचा संघर्ष नसून विचारधारेचा लढा आहे. शिवसेना ही समाज परिवर्तनाची ताकद आहे. आपण प्रत्येक गावात संघटनात्मक ताकद उभी केली पाहिजे.”

यावेळी कोंडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांचे स्मरण करून दिले. “हे तीन दैवत प्रत्येक शिवसैनिकासाठी प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या विचारांवर आधारित कार्यपद्धती अंगीकारूनच आपण स्थानिक प्रश्न सोडवले पाहिजेत आणि जनतेच्या अडचणी समजून घेऊन त्यावर ठोस उपाय सुचवले पाहिजेत,” असे ते म्हणाले.

बैठकीत पक्षाच्या आगामी योजनांचा आढावा घेण्यात आला. युवकांमध्ये जनजागृती, सोशल मीडियाचा प्रभावी वापर आणि प्रत्यक्ष संपर्कातून पक्षाशी नव्या कार्यकर्त्यांना जोडण्यावर भर देण्याचे ठरले सर्व समस्या नोंदवून त्यासंदर्भात संघटनेच्या पुढील कार्ययोजनेत ठोस उपाययोजना करण्याचे आश्वासन देण्यात आले. बैठकीच्या शेवटी उपस्थित शिवसैनिकांनी एकजुटीने काम करत आगामी निवडणुकांमध्ये शिवसेनेचा झेंडा भोर तालुक्यात यशस्वीरीत्या फडकवण्याचा निर्धार केला.



## शिवसेनेची प्रतिमा अधिक मजबूत करण्याचा निर्धार

» बैठकीत पक्षाच्या आगामी योजनांचा आढावा घेण्यात आला. युवकांमध्ये जनजागृती, सोशल मीडियाचा प्रभावी वापर आणि प्रत्यक्ष संपर्कातून पक्षाशी नव्या कार्यकर्त्यांना जोडण्यावर भर देण्याचे ठरले. शिवाय आरोग्य शिबिरे, स्वच्छता मोहिमा, वृक्षारोपण व गरजू विद्यार्थ्यांना मदत असे विविध सामाजिक उपक्रम हाती घेऊन शिवसेनेची प्रतिमा अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## ठोस उपाययोजना करण्याचे आश्वासन

» बैठकीदरम्यान विविध भागांतील स्थानिक समस्या उभारण्यात आल्या. त्यात रस्त्यांची दुरवस्था, पाणीपुरवठ्याची समस्या, एसटी सेवा विस्कळीत होणे यांचा समावेश होता. या सर्व समस्या नोंदवून त्यासंदर्भात संघटनेच्या पुढील कार्ययोजनेत ठोस उपाययोजना करण्याचे आश्वासन देण्यात आले. बैठकीच्या शेवटी उपस्थित शिवसैनिकांनी एकजुटीने काम करत आगामी निवडणुकांमध्ये शिवसेनेचा झेंडा भोर तालुक्यात यशस्वीरीत्या फडकवण्याचा निर्धार केला. या बैठकीत निर्माण झालेल्या उत्साहपूर्ण वातावरणामुळे शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, तालुक्यात पक्षाच्या कार्याला नवसंजीवनी मिळाल्याचे चित्र दिसून येत आहे.

## प्रभागरचना असावी जनतेच्या हितासाठी

» “हे कार्य केवळ निवडणुकीपुरते मर्यादित न ठेवता वर्षभर सातत्याने चालू ठेवावे लागेल. गावागावांत शिवसेनेचे अस्तित्व आणि विचार ठामपणे रुजवण्यासाठी प्रत्येक शिवसैनिकाने आपली सामाजिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे,” असे आवाहनही कोंडे यांनी उपस्थितांना केले.

# वीज कुणाला माफ करत नाही : धर्मराज पेठकर

**महावितरणच्या 20 वर्धापन दिनानिमित्त बारामती येथील कविवर्य मोरोपंत नाट्यगृहात आयोजित स्नेहमेळाव्यात ते बोलत होते.**

**पुणे | प्रतिनिधी**

विजेची कामे करताना अनेक वीज कर्मचाऱ्यांचे, ग्राहकांचे प्राण आजवर धोक्यात आले आहेत. वीज कुणालाही माफ करत नाही, त्यामुळे विजेची कामे करताना सुरक्षा साधनांचा वापर करा, घराची अर्थिंग, सर्किट ब्रेकर सुस्थितीत ठेवा असे आवाहन महावितरण बारामती परिमंडलाचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांनी केले आहे.

महावितरणच्या 20 वर्धापन दिनानिमित्त शुक्रवारी (दि. 6) बारामती येथील कविवर्य मोरोपंत नाट्यगृहात वीज कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी आयोजित स्नेहमेळाव्यात ते बोलत होते. ते म्हणाले, ‘वीज कर्मचाऱ्यांनी कामे करताना आपण घरातील कर्ते आहोत, आपल्यानंतर कुटुंबाचे काय होईल याची कल्पना करुन विद्युत सुरक्षा साधनांचा वापर करावा.

व्यासपीठावर बारामती पोलीस उपविभागीय अधिकारी सुदर्शन राठोड, अधीक्षक अभियंता दीपक लहामगे, अनिल गेडाम व बाळासाहेब हळनोर, सहायक महाव्यवस्थापक कीर्ती भोसले, धैर्यशील गायकवाड यांचेसह बारामती मंडलातील कार्यकारी अभियंते यांची प्रमुख उपस्थिती होती. उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड म्हणाले, ‘लहानपणी आम्ही वीजबिल भरण्यासाठी रांगेत वेळ घालवायचो. पण आता ऑनलाइनमुळे वीजबिल भरणे एका क्षणाचे काम झाले आहे. खासगीकरणाच्या युगातही महावितरण तोडीस तोड कामगिरी करत आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातील शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला अभिवादन करून पहलगाम हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना, शहीद जवानांना व वर्षभरात विजेची कामे करताना मृत्यू झालेल्या वीज कर्मचाऱ्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कर्मचारी पाल्यांचे कलागुणांना व्यासपीठ मिळवून देत चिमुकल्यांच्या उपस्थितीत वर्धापन दिनाचा केक कापण्यात आला.



## राज्यभरात एकाच वेळी विद्युत सुरक्षेची प्रतिज्ञा

» 20 व्या वर्धापनदिनी राज्यात एकाच वेळी सकाळी 10 ते 10.15 यावेळेत सर्व वीज कर्मचारी, अधिकाऱ्यांनी विद्युत सुरक्षेची सामुहिक प्रतिज्ञा घेतली. बारामती येथील सामुहिक प्रतिज्ञा कार्यक्रमाला बारामतीचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड, बारामती पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अनिल बागल, मुख्य अभियंता धर्मराज पेठकर, अधीक्षक अभियंता दिपक लहामगे व अनिल गेडाम यांचेसह महावितरणचे सर्व वरिष्ठ अभियंते, अधिकारी व वीज कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.